दि.०३.०१.२०१९ रोजी भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये भूगोल विभागाचे मा. राहुल गवई यांचे 'भूगोल विषयातील करीअरच्या संधी' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. भूगोल विषयाच्या मुलांनी पारंपारिक शिक्षणाबरोबरच सुदूर संवेदन व भौगोलिक माहिती प्रणाली याविषयी ज्ञान मिळविण्यास त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. आंतरराष्ट्रीय स्तरावर अशा कुशल लोकांना मोठया प्रमाणावर मागणी आहे असे त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा हे होते. प्रास्ताविक व संयोजन भूगोल विभागप्रमुख डॉ. ज्योतिराम मोरे यांनी केले. पाहुण्याचा परिचय डॉ. सुनिल ठाकरे यांनी करून दिला. तर सूत्रसंचालन प्रा. सचिन कांबळे तर आभार महेश गवळी यांनी मानले. याप्रसंगी प्रा. सुभाष शिंदे, डॉ. संजय गायकवाड, प्रा. समिता हांडे, प्रा. शोभा कोकाटे, प्रा. शिवाजी सोनवणे उपस्थित होते.

## स्व.पी.सी.नहार वक्तृत्व स्पर्धेत मॉडर्न महाविद्यालयाचा संघ विजेता



स्व. पी.सी.नहार वक्तृत्व स्पर्धेतील मॉडर्न महाविद्यालय पुणे विजेत्या संघा बरोबर परीक्षक व इतर मान्यवर

स्व.पी.सी. नहार स्मरणार्थ आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत मॉडर्न महाविद्यालयातील कु. स्नेहा शंकर बवले आणि कु. शुभम अशोक राणे या विजेत्या संघाने महाविद्यालयाचा फिरता करडंक पटकविला. या स्पर्धेतचे परीक्षक म्हणून डॉ. निशा भंडारे आणि श्री. धनंजय झोबांडे यांनी काम केले.

जैन महाविद्यालयात आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पधेचे उद्घाटन प्रभारी प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा यांच्या हस्ते झाले. स्पर्धेत ३८ स्पर्धकांनी सहभाग घेतला. प्रथम बक्षिस डॉ. डी. वाय .पाटील पॉलिटेक्निकल कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चरचा कु. आकाश मनोहर पाटील, व्दितीय बक्षिस शिवाजी विद्यापीठातील कु. सिध्देश नंदकुमार मिसाळ, तृतीय क्रमांक राजसिंह मोहिते पाटील कॉलेज, अकलुजचा कु. सुमित अभिमान भोसले आणि कर्वे समाजसेवा संस्थेचा कु. राहुल महादेव गिरी यांच्यात विभागून, उत्तेजनार्थ कु. अनिकेत शशीकांत शिंदे आणि कु. पल्लवी दौंडकर यांना मिळाले. विजेत्या स्पर्धकांना डॉ. संजय गायकवाड यांच्या हस्ते बक्षिस देण्यात आले. स्पर्धेचे संयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. सहदेव चव्हाण, प्रा. सचिन कांबळे, प्रा. सुनिल ठाकरे, प्रा. मोनिका जैन, डॉ. सिध्देश्वर गायकवाड यांनी केले.

## ''सकारात्मक दृष्टीकोन ठेवून स्पर्धा परीक्षेची तयारी ''



स्पर्धा विभागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आय. एफ. एस. परीक्षा उत्तीर्ण असणारे श्री अक्षय भोरडे

गुरूवार दि. २०.१२.२०१८ रोजी भारतीय जैन संघटनेच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेच्यावतीने आयोजित केलेल्या कार्यक्रम प्रसंगी 'आय एफ एस' परीक्षा उत्तीर्ण असणारे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मा. श्री. अक्षय भोरडे यांनी ''सकारात्मक दृष्टीकोन ठेवून स्पर्धा परीक्षेची तयारी'' करावी असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमा दरम्यान त्यांनी पदवी शिक्षण घेत असताना MPSC व UPSC या परीक्षांची तयारी कशी करावी याचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सातत्य, आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन, योग्य मानसिकता या तत्त्वांना स्वीकारू नजर स्पर्धा परीक्षांची तयारी केली तर नक्कीच यश मिळते असा विचार मांडला.

या कार्यक्रमा प्रसंगी माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. संतोष भंडारी व वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा यांनीही विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आयोजन प्रा.सचिन कांबळे यांनी केले, प्रा. समिता हांडे यांनी आभार व्यक्त केले. या प्रसंगी डॉ. भूषण फडतरे, प्रा. सुभाष शिंदे, डॉ. देवीदास पाटील हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद या कार्यक्रमास लाभला.

## कु. स्वाती व्हनवाडे हीचे क्रीडा स्पर्धेतील यश



वेगवेगळ्या स्पर्धां मध्ये विजय संपादन करणारी महाविद्यालयाची वेगवान धावपटू कु. स्वाती

सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्ष खालील विविध स्पर्धेत सहभाग घेऊन यश संपादन केले.

१. पुणे जिल्हा क्रीडा विभागांर्तगत आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धा बी.जे. आळे महाविद्यालयात संपन्न झाल्या सदर स्पर्धेतचे विजेतेपद मिळविले.

२. सांगली येथे आयोजित ६ कि. मी. धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक

३. हडपसर येथे झालेल्या १० कि. मी. धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक

४. खराडी येथे झालेल्या मॅरेथॉन स्पर्धेत प्रथम क्रमांक ५. पुणे जिल्हा क्रीडा विभागाच्या आंतर महाविद्यालयीन ३००० मी व ५००० मी धावणे क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक ६. कोल्हापूर येथे लोकमत महा मॅरेथॉन स्पर्धेत विजेतेपद ७. पुणे येथे आयोजित ३३ व्या ''पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन'' स्पर्धेत (१० कि. मी.) उपविजेतेपद ८. पुणे येथे आयोजित ''पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन'' स्पर्धेत तृतीय क्रमांक ९. नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत ५००० मी. धावणे क्रीडा प्रकारात तृतीय क्रमांक १०. नांदेड येथे झालेल्या राज्यस्तरीय क्रॉसकंट्री स्पर्धेतून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

## 'बॉक्सींग स्पर्धेमध्ये बीजेएस संघ विजेता'

भारतीय जैन संघटना महाविद्यालय वाघोली बॉक्सींग स्पर्धेमध्ये पुणे जिल्हा विजेता संघ म्हणून घोषित करण्यात आला. दि. ०४.१०.२०१८ रोजी महाविद्यालयामध्ये पुणे जिल्हा क्रीडा विभागांर्तगत झालेल्या स्पर्धेमध्ये बीजेएस संघ विजेता ठरला. सदर स्पर्धा बीजेएस वाघोली, पुणे येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये पुणे जिल्हयातील एकुण ४५ महाविद्यालयातील १५० खेळाडू व ७ महिला खेळाडू सहभागी झाल्या होत्या. सदर स्पर्धेसाठी लंडन ऑलपिकमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व केलेले व ज्यांना भारत सरकारने अर्जुन पुरस्कार देऊन सन्मानित केलेले असे श्री. देवेंद्र सिंग यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये मुलींच्या गटामध्ये भारतीय जैन संघटना महाविद्यालयास विजेतेपद मिळाले. तर उपविजेते पद आर. एम. सी. महाविद्यालय आकुर्डी यांना मिळाले.

मुलांच्या गटामध्ये भारतीय जैन संघटना महाविद्यालय व आर. जे.एस.पी. एन. भोसरी यांना संयुक्त विजेतेपद मिळाले, तर उपविजेतेपद आर. एम. सी. महाविद्यालय आकुर्डी यांना प्राप्त झाले. सदर स्पर्धा यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रमेश गायकवाड, श्री. गिरीश शहा, श्री. सुर्यकांत दुधभाते, श्री. अमर खराडे व शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.


संपादक – प्राचार्य डॉ.किशोर देसर्डा
कार्यकारी संपादक – प्रा. डॉ. सिध्देश्वर गायकवाड
सदस्य – प्रा. डॉ. मोनिका जैन, प्रा. शोभा कोकाटे

शांतिदूत संपादक मंडळ



विनामूल्य वाटप करण्यासाठी शांतिदूत हे भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे वार्तापत्र संपादक प्राचार्य किशोर देसर्डा यांनी प्रकाशित करून कार्यकारी संपादक प्रा. डॉ. सिध्देश्वर गायकवाड यांनी प्रसिद्ध केले. अंक सजावट व मुद्रण : श्री राज प्रिंटर्स मुद्रणालय, पुणे.



BJS Bharatiya Jain Sanghatana

# शांतिदूत

## कॉलेज वार्तापत्र

भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
बकोरी फाटा, वाघोली, पुणे - ४१२ २०७
वर्ष २०१८-१९, अंक १, जानेवारी २०१९
संपादक : प्राचार्य किशोर देसर्डा


## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भूगोल अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी डॉ.ज्योतिराम मोरे बिनविरोध



डॉ. ज्योतिराम मोरे यांचा सत्कार करताना मा. प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा व शाखाप्रमुख

नुकत्याच झालेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध अभ्यास मंडाळाच्या अध्यक्षांच्या निवडणूका पार पडल्या. यामध्ये भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या भूगोल विभागाचे प्रमुख डॉ. ज्योतिराम मोरे यांची भूगोल अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. डॉ. मोरे हे १९९५ - १९९६ पासून महाविद्यालयात भूगोल विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. गेल्या २५ वर्षापासून अध्ययन, अध्यापन व संशोधन या क्षेत्रात कार्यरत आहेत. ते पुणे विद्यापीठाचे एम. फिल. व पीएच. डी. चे मार्गदर्शक आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तीन विद्यार्थ्यांनी पीएच. डी व एक विद्यार्थ्यांने एम. फिल. चे संशोधन पुर्ण केले आहे. सध्या सहा विद्यार्थी पीएच. डी. व चार विद्यार्थी एम.फिलचे संशोधन करत आहेत. त्यांनी आतापर्यत बारा पुस्तके व बेचाळीस शोध निबंध प्रकाशित केले आहेत. त्यांनी विद्यापीठ व युजीसीचे सहा शोध प्रकल्प पुर्ण केले आहेत. ते मागील पंचवार्षिक मध्ये भूगोल अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून निवडून आले होते. ते महाराष्ट्र भूगोल शास्त्र परिषदेचे सचिव आहेत. त्यांच्या या शैक्षणिक व सामाजिक कामांची दखल घेत सा.फु. पुणे विद्यापीठाने त्यांना फेब्रुवारी २०१८ ला आदर्श शिक्षक पुरस्कार देवून सन्मानित केले आहे.

अशा शैक्षणिक व सामाजिक कामाचा प्रदीर्घ अनुभव असणारे डॉ. मोरे हे भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून आपल्या कामाचा ठसा नक्की उमटवतील त्यांना त्यांच्या भविष्यातील कामासाठी भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. शांतिलाल मुथ्था, अध्यक्ष प्रफुल्ल पारख, डॉ. बी. बी. चौगुले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, विकास अधिकारी श्री. सी. आय. कोचर, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## भारतीय जैन संघटना महाविद्यालय रक्तदान शिबिर



रक्तदान कार्यक्रमात १०५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान करताना श्री. अमर खराडे

दि. १४.०८.२०१८ रोजी वार मंगळवार भारतीय जैन संघटेनेच्या कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत स्वातंत्र्यदिन व भारतीय जैन संघटनेचे अध्यक्ष शांतिलालजी मुथ्था यांच्या ६५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. रक्तदान शिबिराचे उद्घाटन वाघोली ग्रामपंचायत सरपंच सौ. वसुंधराताई उबाळे व वाडे बोल्हाई गावचे सरपंच श्री. दिपक गावडे यांच्या हस्ते झाले. या शिबीरात १०५ जणांनी रक्तदान केले तर १५० जणांच्या रक्तातील हिमोग्लोबीनची तपासणी करण्यात आली. या वेळी श्री. शिवदास उबाळे, श्री. दत्ता हरगुडे, केसनंद गावचे ग्रामपंचायत सदस्य श्री. सचिन जाधव, श्री. प्रवीण भोर , श्री. अजित ज्ञा. पवार, तसेच बीजेएसचे विकास अधिकारी श्री.कोचर सी.आय. महाविद्यालयाचे प्रा. प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, सेवक, विद्यार्थी युवक - युवती आणि वाघोली परिसरातील ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, कर्मचारी व इतर सामाजिक कार्यकर्त्यांनीही उत्साहाने सहभाग घेतला.

या कार्यक्रमास कार्यक्रम अधिकारी प्रा. सुभाष शिंदे, प्रा. समिता हांडे, प्रा. विवेकानंद टाकळीकर, डॉ. भूषण फडतरे, डॉ. एस. डी. गायकवाड, डॉ.बी.बी.लांडगे, डॉ. रमेश गायकवाड, डॉ. ज्योतीराम मोरे, डॉ.रूपाली गुलालकरी, श्री.रामदास बटुळे व विद्यार्थी स्वयंसेवक यांचे सहकार्य लाभले.

## महाविद्यालय वर्धापन दिन व शिक्षक दिन उत्साहात साजरा

दि. ५ सप्टेंबर २०१८ बुधवार भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आज अनोख्या पद्धतीने महाविद्यालयाचा वर्धापन दिन व शिक्षक दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. आज महाविद्यालयात शिपायापासून ते प्राचार्य पर्यंतच्या सर्व पदांच्या जबाबदाऱ्या विद्यार्थ्यांनी पार पाडल्या. एक दिवसा करिता महाविद्यालयाचे प्राचार्य व उपप्राचार्य म्हणून अनुक्रमे कु. आकाश कुसुमाडे व कु. शुभम नफ्ते यांनी कामकाज पाहिले व



महाविद्यालय वर्धापन दिन व शिक्षण दिन निमित्त मा.प्राचार्य किशोड देसर्डा यांचा सत्कार करताना विकास अधिकार मा. कोचर सर व इतर मान्यवर

आजच्या दिवसांकरिता नियुक्त असणाऱ्या सर्व शिक्षकांनी व माजी विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाने केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भारतीय जैन संघटनेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. संतोष भंडारी यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालय वर्धापन दिन व शिक्षक दिनांच्या शुभेच्छा दिल्या व खूप शिका, मोठे व्हा, आपल्या आई - वडिलांचे नाव मोठे करा. जीवनात शिक्षकांचे महत्व फार मोठे आहे. त्यामुळे त्यांचा मान ठेवा शिक्षकांचा आदर करा कारण तेच तुमच्या जीवनाचे खरे शिल्पकार आहेत. असा संदेश दिला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा म्हणाले महाविद्यालय वर्धापन दिन व शिक्षक दिनांच्या शुभेच्छा दिल्या. आपल्याला कोणत्याही क्षेत्रात जायचे असो तुम्हाला यशस्वी व्हायचे असेल तर तुम्हाला चांगले शिक्षक मिळणे गरजेचे आहे. कोणतीही व्यवस्था बदलायची असेल तर ही कामगिरी फक्त शिक्षकच करू शकतात असा आशावाद व्यक्त केला.

सदर समारंभाचे यशस्वी आयोजन करण्यासंदर्भात मा. कोचर सर - विकास अधिकारी, डॉ. किशोर देसर्डा प्राचार्य याचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुभाष शिंदे यांनी केले तर आभार कु. गोरडे पुजा यांनी मानले सूत्रसंचालन कु. जाधव प्रसाद यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वैदकीय अधिकारी मा.दिलीप कचेरे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बहिःशाल शिक्षण मंडळ व भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १०.०९.२०१८ ते १२.०९.२०१८ कालावधीत डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. या व्याख्यानमालेत वैद्यकीय अधिकारी मा. दिलीप कचेरे यांनी हसत खेळत डासांवर पाळत या विषयावर आपले विचार मांडून मानवी आरोग्य व सुरक्षितता याची दखल आपल्या व्याख्यानातून घेतली.

दि. ११.०९.२०१८ रोजी व्याख्यानमालेच्या दुसऱ्या दिवशी मा. मकरंद टिल्लु यांनी गोष्ट शंभर कोटीची पाण्याच्या मैत्रीची या विषयी विचार मांडले. पाण्याचे महत्त्व, पाणी वाचवा देश वाचवा, जल है तो कल है भविष्यकलीन पाणी समस्या या विषयी विवेचन केले. व्याख्यानमालेच्या तिसऱ्या दिवशी दि. १२.०९.२०१८ रोजी मा. डॉ. पांडुरंग कंद यांनी ज्याच्या हाती शुन्य होते या विषयावर आपले विचार मांडले, त्यांनी आपल्या व्याख्यानात डॉ. ए. पी. जे. कलाम यांच्या भरत आंधळे या सारख्या अनेक व्यक्तींची चरित्रे युवकांना प्रेरणादायी ठरतील असा विचार मांडून भविष्यकाळ उज्वल करण्यासाठी उदात्त ध्येय, कृती, विचार या माध्यमातुन यशस्वी कशा पध्दतीने होता येते याचा आढावा आपल्या मनोगतातुन व्यक्त केला. तीनही कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन बहिःशाल विभाग प्रमुख डॉ. सुनिल ठाकरे, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सहदेव चव्हाण, प्रा. सचिन कांबळे, आभार कु. शांभवी फडतरे, नाजमिन शेख, यांनी केले. व्याख्यानमाले प्रसंगी डॉ. ज्योतीराम मोरे, प्रा. समिता हांडे, प्रा. शोभा कोकाटे, प्रा. दिपक अंजळ, प्रा. शिवाजी सोनवणे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या संयोजनात सचिन सावनजी व अक्षय हरगुडे, अभिजित बिरवडे यांचा सहभाग होता.

## बीजेएस महाविद्यालयाने ३३ कोटी वृक्ष लागवडीसाठी कंबर कसली



३३ कोटी वृक्ष लागवडीसाठी कटिबद्ध हरित मित्र परिवाराचे संस्थापक डॉ. महेंद्र घागरे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी

भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत वार शनिवार दि.१५.०९.२०१८ रोजी हरित मित्र परिवारचे संस्थापक, चंदनतज्ञ व वनश्री डॉ. महेंद्र घागरे यांचे व्याख्यान पार पडले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. घागरे यांनी चंदनाची वृक्ष लागवड कशी करावी, लागवडीची पुर्वतयारी, खत व पाणी व्यवस्थापन, चांगल्या चंदनवाढीसाठी घ्यावयाची काळजी यासंबंधी विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना दिली. वृक्ष लागवड हे काम सरकारचे नसून ते समाजाचे आहे व आपण निसर्गाच्या सानिध्यात सकारात्मक दृष्टीकोन स्किारला असे सांगितले. डॉ. महेंद्र घागरे यांनी २०० विद्यार्थ्यांना १०००० शम्मी, शिवन, रक्तचंदन, पुत्रंजिवा, या वृक्षांच्या बियांचे वाटप केले. त्यांनी ३३ कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प यशस्वी करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा यांचे मार्गदर्शन लाभले. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सुभाष शिंदे, प्रा. समिता हांडे, प्रा. विवेकानंद टाकळीकर यांनी केले. तसेच या कार्यक्रमास मोठया संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## हिंदी दिवस उत्साहात साजरा



हिंदी दिवसानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. सजित खांडेकर

भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय वाघोली पुणे येथे दि.१४.०९.२०१८ रोजी हिंदी दिवस उत्साहात साजरा केला गेला. या निमित्ताने हिंदी विभागाने कथावाचन, सेमिनार यांचे आयोजन केले. या कार्यक्रमामध्ये एस. वाय. बी. ए., टी. वाय. बी. ए., चे हिंदी विशेष (स्पेशल)चे विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

तसेच,दि.१९.०९.२०१८ रोजी मा. डॉ. सजित खांडेकर यांचे हिंदी भाषा का महत्व या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. त्यांनी हिंदी भाषा का महत्व, हिंदी में रोजगार की उपलब्धि, हिंदी का समृध्द साहित्य हिंदी राष्ट्रभाषा, राजभाषा याविषयी आपले विचार व्यक्त केले. हिंदी विभाग अध्यक्ष डॉ. सिद्धेश्वर गायकवाड यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रा. शोभा कोकाटे ही या कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांचे या कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

## 'विज्ञान विभागाची पालक सभा संपन्न'



कन्या वाचवा अभियान अंतर्गत कु.दर्शना पाटील चे स्वागत करताना मा.संतोष भंडारी प्रा. मनिषा बोरा, डॉ. डी. एन. पाटील, प्रा. डॉ. आर. अंजाळ, डॉ. एम. व्ही. देशमुख

दि.२६.०९.२०१८ रोजी भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय वाघोली पुणे येथे विज्ञान विभागाच्या पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्राचार्य संतोष भंडारी यांनी आलेल्या पालकांना मार्गदर्शन केले तसेच पाल्याचा व्यक्तीमत्त्व विकास, अभ्यासातील प्रगती व उत्तम नागरीक बनण्याकरिता पालकांची भूमिका किती महत्त्वाची आहे. यासंबंधी पालकांशी संवाद साधला. पालक सभे निमित्त शै.वर्ष २०१८-२०१९ मध्ये विज्ञान विभागातील मल्होत्रावेकफिल्ड फाऊंडेशन तर्फे शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या ७ विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. यानिमित्ताने महाविद्यालया तर्फे कन्या वाचवा अभियान व लखपती योजने अंतर्गत कु. दर्शना पाटील या कन्येला मुदत ठेव रू.१५०००/- तिच्या उच्च शिक्षणाची तरतुद म्हणून भेट देण्यात आली. विद्यार्थी व पालक यांचे मैत्रीचे नाते व सुसंवाद साधावा या दृष्टीने पालक व विद्यार्थ्यांनासाठी प्रा. मनिषा बोरा यांनी अभिनव खेळाचे आयोजन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान विभाग प्रमुख प्रा. दिपक अंजळ यांनी केले, तसेच महाविद्यालयातील उपक्रम व पालकांची भूमिका याविषयी डॉ. संजय गायकवाड, डॉ. माधुरी देशमुख व डॉ. देवीदास पाटील यांनी पालकांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष भंडारी हे होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. धनश्री उदावंत, आभार प्रदर्शन डॉ. रूपाली गुलालकरी यांनी केले. पालकांचा उत्स्फुर्त सहभागी होऊन विज्ञान विभागातील प्राध्यपकांशी संवाद साधला.

## भारतीय जैन संघटनामहाविद्यालय वृक्षारोपण

दि.२८.०७.२०१८ रोजी वार शनिवार भारतीय जैन संघटेनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालया नजीकच असणाऱ्या ग्रीनसनराईज हिल या टेकडीवर वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. महाविद्यालयातील रा.से.यो. विभाग व वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने सदरचा कार्यक्रम पार पडला. आजच्या वृक्षारोपण कार्यक्रमात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ५०० झाडे लावली.



ग्रीन सनराईज हिल या टेकडीवर वृक्षारोपण करण्यासाठी गेलेले रा.से.यो. व वनस्पतीशास्त्र विभागाचे प्राध्यापक व विद्यार्थी

या प्रसंगी महाविद्यालयाचे वनस्पतीशास्त्र प्रमुख डॉ. डी. एन. पाटील व रा.से.यो. विभाग प्रमुख कार्यक्रम अधिकारी प्रा. सुभाष शिंदे यांनी वृक्षांचे मनुष्यांच्या जीवनातील महत्व व निसर्गचक्रात वृक्षांचे योगदान याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा व विकास अधिकारी मा. श्री कोचर सी.आय. यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेमुळे सदरचा कार्यक्रम ग्रीनसनराईज हिल येथे यशस्वीरित्या पार पडला. या प्रसंगी वनरक्षक वाघोली बीट - मा. श्री. वायकर बी. एस. , श्री. चंद्रकांत नागतोडे व इतर सदस्य तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक - डॉ. माधुरी देशमुख, प्रा. धनश्री उदावंत, प्रा. आरती सरोदे, डॉ. ज्योती मगर. प्रा. संगीता पठारे. प्रा. राजाभाऊ जमदाडे. तसेच श्री. रामदास बटुळे, कु.अमर खराडे व श्री. नवनाथ बटुळे, इ. उपस्थित होते.

## राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती



राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त आगाखान पॅलेस येथे स्वच्छता मोहिमेत सहभागी मा.प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा कार्यक्रम अधिकारी प्रा. सुभाष शिंदे इतर मान्यवर व स्वयंसेवक

दि. ०२.१०.२०१८ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५० वी जयंती साजरी करण्यासाठी भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० स्वयंसेवक आगाखान पॅलेस शास्त्रीनगर पुणे येथे उपस्थित होते. सकाळी ठीक ९ ते १२ वा या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी श्रमदान केले. यावेळी प्रमुख कार्यक्रम अधिकारी प्रा. सुभाष शिंदे व भूगोल विभागाचे प्रमुख डॉ ज्योतिराम मोरे,वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ देवीदास पाटील, आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा उपस्थित होते

## "आंतरराष्ट्रीय स्तरावर भूगोलच्या मुलांना मोठी संधी"



भूगोल विषयातील संधी संदर्भात मा.राहुल गवई, यांच्या व्याख्यानाप्रसंगी उपस्थित मा.प्राचार्य, भूगोल विभाग प्रमुख व मान्यवर